


साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

**बुद्धवर्ष 2567, मार्गशीर्ष पौर्णिमा, 26 डिसेंबर, 2023 वर्ष 7 अंक 10**

**वार्षिक शुल्क** रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

## धम्मवाणी

**यो च बुद्धञ्च धम्मञ्च, सङ्घञ्च सरणं गतो।**
**चत्तारि अरियसच्चानि, सम्मप्पञ्ञाय पस्सति॥**
**दुक्खं दुक्खसमुप्पादं, दुक्खस्स च अतिक्कमं।**
**अरियं चट्ठङ्गिकं मग्गं, दुक्खूपसमगामिनं॥**
**एतं खो सरणं खेमं, एतं सरणमुत्तमं।**
**एतं सरणमागम्म, सब्बदुक्खा पमुच्चति॥**

*– धम्मपदपालि 190, 191,192, बुद्धवग्गो*

जो बुद्ध, धर्म आणि संघाच्या शरणात गेला आहे, जो चार आर्यसत्यांना म्हणजेच- दु:ख, दु:खाची उत्पत्ती, दु:खातून मुक्ती आणि मुक्तीगामी आर्य अष्टांगिक मार्गाला - सम्यक प्रज्ञेने पाहतो, हीच मंगलदायक शरण आहे, हीच उत्तम शरण आहे. हीच शरण प्राप्त करून (व्यक्ती) सर्व दु:खांमधून मुक्त होतो.

(आत्मकथन)

## धर्म यात्रेची पन्नास वर्ष

एक सप्टेंबर, १९५५, माझ्या जीवनाचा अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस. माईग्रेनच्या डोकेदुःखीचा असाध्य व असह्य रोग, जो माझ्या डोक्यावर अभिशाप बनून चढला होता, तोच आता माझ्यासाठी वरदान बनला. मी गुरुदेव परमपूज्य सयाजी ऊ बा खिनांच्या विपश्यना ध्यान शिबिरात दहा दिवसांसाठी सामील झालो. शिबिरात सामील होण्यापूर्वीचा माझा संकोच, या संकोचापासून पूर्णपणे मुक्त झालो नसतांनाही त्यात सामील होणे आणि या शिबिरामुळे आश्चर्यजनक रुपाने लाभान्वित होणे - हे आता इतिहासाचे एक बहुचर्चित पृष्ठ बनले आहे.

मूळ संकोच तर याच बाबीचा होता की ही बौद्ध धर्माची साधना आहे. यामुळे प्रभावित होऊन मी आपला जन्मजात हिंदू धर्म तर त्यागणार नाही ना? मी बौद्ध तर बनणार नाही ना? जर असे झाले तर घोर अनिष्ट होईल. मी धर्मभ्रष्ट होईन. माझे घोर पतन होईल. बुद्धांप्रती असीम श्रद्धा असूनही बौद्ध धर्माप्रती अश्रद्धाच नाही तर क्षुद्र भावही होता. परंतु तरीही या शिबिरात सामील झालो, कारण गुरुदेवांनी विश्वासाने सांगितले होते की विपश्यना विधित शील, समाधी, प्रज्ञेव्यतिरिक्त अजून काहीही शिकवले जाणार नाही. या तिन्हींना माझ्यासारख्या एखाद्या हिंदूचाच नाही तर कोणत्याही धार्मिक परंपरेच्या व्यक्तीचाही काय विरोध असेल?

शील-सदाचाराचे जीवन जगणे, समाधिद्वारे मन वश करणे, प्रज्ञा जागवून चित्ताला शक्य तितके विकारविहीन बनवणे - या तिन्ही शिकवणुकींचा कोणीही समजदार मनुष्य विरोध करुच शकत नाही. मला तर क्रोध आणि अहंकारासारख्या मनोविकारांपासून सुटका हवी होती, ज्यामुळे तणावपूर्ण जीवन जगून मी माईग्रेनचा रोगी झालो होतो. विकार दूर होतील तर तणाव दूर होतील आणि तणाव दूर होतील तरच माईग्रेन दूर होईल - हे सत्य मला खूप स्पष्टपणे समजले होते. याव्यतिरिक्त ज्या परिवारात जन्मलो आणि ज्या वातावरणात वाढलो, त्यात दुराचरणापासून विरत राहाणे आणि सदाचारात निरत राहाणे, तसेच आपल्या चित्ताला विकारांपासून विमुक्त राखणे - जीवनात हाच आदर्श उतरवण्याचे महत्व शिकवले गेले होते. त्यामुळे जेव्हा गुरुदेवांनी सांगितले की भगवान बुद्धांनी हेच शिकवले आहे आणि विपश्यनेतही हेच शिकवले जाईल, याव्यतिरिक्त अन्य काहीही शिकवले जाणार नाही, हे ऐकून मी आश्वस्त झालो होतो. परंतु तरीही मनाच्या एका कोपऱ्यात थोडासा विरोध होताच.

बुद्धाच्या शिकवणुकीबाबत काही अशा बाबी ऐकल्या होत्या, ज्याचे अनुसरण करणे मी योग्य समजत नव्हतो. त्यामुळे मनात हा निर्णय केला की शिबिरात मला केवळ शील, समाधी आणि प्रज्ञेचाच अभ्यास करायचा आहे.या तिघांव्यतिरिक्त मला अन्य काहीही स्वीकारायचे नाही. या विद्येला तपासून पाहण्यासाठी शिबिरात सामील झालो आहे.

इतके तर मी समजतच होतो की बुद्धवाणीत अनेक उत्तम शिकवणुकी विद्यमान आहेत, तेव्हाच ही विश्वाच्या इतक्या देशात

आणि इतक्या मोठ्या संख्येने लोकांद्वारे मान्य झाली आहे, पूज्य झाली आहे. परंतु यात जे काही चांगले आहे, ते आमच्या वैदिक ग्रंथांतून घेतले गेले आहे. त्यामुळे यात ज्या काही हानिकारक बाबी मिसळल्या आहेत, त्या माझ्यासाठी सर्वस्वी त्याज्य राहतील याची पूर्ण काळजी घेईन.

शिबिराचे दहा दिवस पूर्ण होता-होता मी पाहिले की माझ्या गुरुदेवांच्या सांगण्यानुसार शील, समाधी व प्रज्ञेशिवाय तिथे अजून काहीही शिकवले गेले नाही. या विद्येचे तात्काळ फलदायी होण्याचा दावाही सत्य आढळला. दहा दिवसांच्या अभ्यासानेच मनाचे विकार निघणे आरंभ झाले. त्यामुळे माईग्रेनचा भयंकर रोग दूर झाला, जो मानसिक तणावामुळेच मला दुःखी बनवून ठेवत होता. माईग्रेनसाठी दिल्या जाणाऱ्या अफीमच्या दुःखदायी सूईपासूनही नेहमीसाठी सुटका मिळाली. बहुधा झोपेसाठी घेतल्या जाणाऱ्या नशील्या औषधांपासूनही नेहमीसाठी मुक्ती मिळाली. ज्या विकारांच्या जागण्यामुळे मन व्याकुळतेने भरत असे, आता विपश्यनेच्या दैनिक अभ्यासामुळे ते क्षीण होऊ लागले. सर्वात मोठी जाणीव ही झाली की या विद्येत मला काहीही दोष आढळला नाही. सर्वस्वी निर्दोषच निर्दोष. कोणतीही हानी आढळली नाही. सर्वस्वी लाभदायीच लाभदायी.

पहिल्याच शिबिरात मला विपश्यना इतकी शुद्ध वाटली की जिथपर्यंत साधनेचा प्रश्न आहे मला दुसरीकडे कुठेही बघण्याचीही आवश्यकता राहिली नाही. माझ्या आध्यात्मिक शोधाचे पूर्ण समाधान झाले. मी या विद्येत परिपूर्ण होण्यासाठी सकाळ-संध्याकाळ रोज नियमित एक-एक तास ध्यान करत राहिलो. त्यासोबतच वर्षभरात कमीत कमी एक दहा दिवसांचे शिबिर करत राहिलो. कधी एका महिन्याचे दीर्घ शिबिरही केले, ज्यामुळे ही विद्या स्वानूभूतीने सखोलतेने समजू लागली. ही नितांत न्यायसंगत आणि धर्मसंगत वाटली, व्यावहारिक आणि वैज्ञानिक वाटली. यात अंधविश्वासासाठी थोडीशीही जागा आढळली नाही. गुरुदेव म्हणतात म्हणून अथवा बुद्धांनी सांगितले म्हणून अथवा त्रिपिटकात लिहिले आहे म्हणून अंधश्रद्धेने मानण्याचा कोणताही आग्रह नाही. जे काही म्हटले गेले आहे त्याला बुद्धीच्या स्तरावर समजा आणि नंतर अनुभूतीच्या स्तरावर जाणा, तेव्हा स्वीकारा. न समजता, न जाणता, अनुभवाविना, आंधळेपणाने स्वीकारु नका.

आर्यसमाजाने मला बुद्धिवादी बनवले आणि अंधविश्वासापासून दूर केले. हीच जीवनाची एक खूप मोठी उपलब्धी होती. परंतु विपश्यना तर यापेक्षाही पुढे निघाली. बुद्धिजन्य शुष्क दार्शनिक विवाद आणि आर्द्र भक्तीच्या भावावेशातून विमुक्त करुन, हिने मला आध्यात्मिक क्षेत्राचा यथार्थ अनुभव करणे शिकवले. जितके-जितके सत्य अनुभूतीवर उतरले, तेवढे-तेवढे स्वीकारत पुढे जात गेलो आणि त्यापेक्षा सूक्ष्मतर सत्यांना अनुभूतीवर उतरवत राहिलो. जितके-जितके अनुभूतीवर उतरवले, त्याला स्वीकारत हे तपासत राहिलो की मनोविकार दुर्बळ होत आहेत की नाहीत! त्यांचे निर्मूलन होत आहे की नाही! वर्तमानाच्या प्रत्यक्ष सुधाराला महत्व देणारी ही शिकवणुक योग्य वाटली. हे स्पष्टपणे समजले की वर्तमान सुधारत आहे, तर भविष्य आपोआप सुधारेल. लोक सुधारत आहे तर परलोक सुधारेलच. हेही खूप चांगले समजले की आपल्या मनाला मलिन करण्याची शतप्रतिशत जबाबदारी स्वत: आपली आहे. कोणतीही बाह्य अदृश्य शक्ती याला का मलिन करेल बरे? त्यामुळे याला सुधारण्याचे दायित्वही शतप्रतिशत आपलेच आहे. गुरुची कृपा केवळ इतकीच आहे की त्याने मोठ्या करुणेने आम्हाला मार्ग दाखवला आहे. पाऊल-पाऊल चालणे तर आम्हाला स्वत:च करावे लागेल. कोणी अन्य आम्हाला खांद्यावर उचलून मुक्त अवस्थेपर्यंत पोहचवेल, या धोक्यापासून सर्वस्वी मुक्ती मिळाली. हे सत्य अनुभूतीच्या स्तरावर स्पष्ट होत गेले.

या विद्येने अदृश्य देवी-देवतांप्रती घृणा अथवा द्वेष जागवणे शिकवले नाही, उलट त्यांच्याप्रती मैत्रिभाव ठेवणे शिकवले. "आपली मुक्ती आपल्या हाती, आपले परिश्रम आपला पुरुषार्थ" च्या भावाने अहंकार जागवला नाही, तर आपल्या जबाबदारीबाबत विनम्र सतर्कता जागवली. परावलंबनाऐवजी स्वावलंबी होण्याचा बोध कल्याणकारी वाटला. "स्वावलंबनाच्या एका अनुभवावर, अर्पित कुबेराचा कोष." एका कविचे हे बोल स्मरण होताच तन-मन रोमांचित झाले. त्यामुळे जिथपर्यंत साधनेचा प्रश्न आहे, संशयासाठी अल्पमात्रही जागा उरली नाही. संशय राहीलच कसा? प्रत्यक्षाला प्रमाणाची गरज कशाला? प्रत्यक्ष लाभ जो होत होता. जीवनच बदलले. जसे एक नवीन जन्म मिळाला.

सन १९५४, पंचवीसशे वर्षाच्या प्रथम बुद्ध शासनाचे अंतिम वर्ष होते. याच वर्षात मी पहिल्यांदा बुद्ध शासनाच्या संपर्कात आलो. शाकाहारी भोजनाच्या व्यवस्थेसाठी मला सहाव्या संगायनाच्या भोजन प्रबंधक समितीत निवडले गेले. सन १९५५, पंचवीसशे वर्षाच्या द्वितीय बुद्ध शासनाचे प्रथम वर्ष होते. याच वर्षी मला विपश्यना विद्या प्राप्त झाली. असे वाटते की द्वितीय बुद्ध शासनाची सुरवात करणारे हे प्रथम वर्ष माझ्या सौभाग्याचा सूर्योदय बनून आले. प्रथम बुद्ध शासनाचे अंतिम वर्ष माझ्यासाठी या भाग्योदयी सूर्याच्या शुभागमनाची पूर्व सूचना देत प्रात:काळाची लालीमा घेऊन आले. धर्मयात्रेच्या या ५० वर्षांनी माझ्या जीवनाला सार्थक बनवले, सफल बनवले. मी धन्य झालो.

शेष जीवन धर्मालाच समर्पित राहो.

धर्मपथिक,

सत्यनारायण गोयन्का

*(– वर्ष 35, बुद्धवर्ष 2549, आश्विन पौर्णिमा, 17-10-2005, अंक 4)*

## मंगल मृत्यू

मदुराईचे आचार्य श्री एम. ए. सुब्रमणीयम 23 ऑक्टोबरला प्रवास करत असताना गाडीमध्ये दिवंगत झाले. अंतिम क्षणांपर्यंत ते एकदम सजग, सचेत राहिले. 1998 पासून त्यांनी सहायक आचार्याच्या रुपात तमिळनाडु प्रदेशात अनेक शिबिरांचे संचालन केले. मलेशियातही तमिळ भाषियांसाठी शिबिर आयोजित केले तसेच अनेक अकेंद्रीय शिबिरांमध्येही सेवा देत राहिले. त्यांनी सर्व प्रकारच्या धर्म-सामग्रीचा तमिळ भाषेमध्ये अनुवाद केला जसे- 1-दिवसीय पासून 60-दिवसीय शिबिरांपर्यंतचा. याव्यतिरिक्त अनेक धर्म पुस्तकांचाही तमिळ भाषेमध्ये अनुवाद करण्यात तसेच त्यांचे प्रकाशन करण्यात सहयोग दिला. ते धम्मसेतु, चेन्नई आणि धम्म अरुणाचल केंद्रांमध्ये केंद्र आचार्याच्या रुपात सेवारत राहिले. या सर्व पुण्यकार्यांच्या फलस्वरूपाने ते धर्मपथावर सतत पुढे जात निर्वाणलाभी होवोत ! धर्मपरिवाराची हीच मंगल कामना.

-----------------------

### ऑनलाइन भावी शिबिर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर खालील लिंक्स वर उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करावे. *https://schedule.vridhamma.org व www.dhamma.org*

विश्वभरातील सर्व भावी शिबिरांची माहिती व आवेदनासाठी: *https://schedule.vridhamma.org व www.dhamma.org*, व खालील लिंक पहावी www.hindi.dhamma.org

°°°°°°°°°°°°°°°°°°°°°°

**अतिरिक्त उत्तरदायित्व**

**केंद्र-आचार्य**

1. श्री अशोक बाभळे, मुम्बई— ‘धम्म उदक’, दापोली (रत्नागिरि) विपश्यना केंद्र आचार्यांच्या रूपाने सेवा
2. श्रीमती संतोषी बाभळे, ‘धम्म उदक’, दापोली (रत्नागिरि) विपश्यना केंद्राच्या-आचार्यांची सहायता/सेवा

**नवे उत्तरदायित्व**

**वरिष्ठ सहायक आचार्य**

1. श्री कर्मा जिग्मे दावा, पूर्व सिक्किम
2. श्रीमती त्रिशा कोठारी, (गुजरात)
3. श्रीमती भारती शाह, सुरत
4. U Aung Kyaw Nyan Wai, Myanmar
5. U Myo Myint Thein, Myanmar
6. U Aung Myat Cho, Myanmar
7. U Khin Saung Nyunt, Myanmar
8. Daw Nang Kham Phone, Myanmar
9. Daw Lay Sint, Myanmar
10. Daw Yi Yi -1, Myanmar

**नव नियुक्ती**

**सहायक आचार्य**

1. श्री प्रवीण काटपाताल, नवी मुंबई
2. श्रीमती शशि तोदी, अहमदाबाद
3. श्रीमती रामेश्वरी खुशालसिंह परदेशी
4. Mr. Li Zhuang Wang, China
5. U Khin Mg Win, Myanmar
6. U Tint Lwin, Myanmar
7. U Sein Win, Myanmar
8. U Sai Cho, Myanmar
9. U Tun Tun Khaing, Myanmar
10. U Hling Lay, Myanmar
11. U Aung Naing Lay, Myanmar
12. Daw Nyo Nyo Tin, Myanmar
13. U Thet Tin Sein, Myanmar
14. U Chandra Kumar, Myanmar
15. Ms. Than Aye, Myanmar
16. Ms. Win Win Myint, Myanmar
17. Ms. Khin Htwe, Myanmar
18. Ms. Soe Pyint, Myanmar
19. Ms. Yee Yee - 2, Myanmar

**बालशिबिर शिक्षक**

1. श्री मुकुल शर्मा ठाणे
2. Mr. Xiong Qi, Sichuan, china
3. Mr. Wu Jian-e, Sichuan, china
4. Mr. Song YuLin, Sichuan, china
5. Mr. Li Weidong, Hunan, China
6. Mr. Jiming li, China

## महत्त्वपूर्ण सूचना

GVF ला दान पाठवणाऱ्यांनी कृपया लक्ष द्या की ज्या कारणासाठी पैसे पाठवित आहात त्याचा उल्लेख अवश्य करावा म्हणजे ते दान त्याच कारणासाठी जमा केले जाईल आणि त्याच प्रकारे त्याची रिसीट बनवली जाईल. (धन्यवाद)

## मुंबई महानगर क्षेत्रातील विपश्यनेसंबंधी कार्यक्रम

मुंबई महानगर तसेच आसपासच्या क्षेत्रांमध्ये कित्येक विपश्यना केंद्र आणि ध्यानाच्या सुविधा उपलब्ध आहेत. याविषयीच्या साविस्तर माहितीसाठी कृपया खालील लिंक वर पहावे- https://mumbai.vridhamma.org

अशा प्रकारे **संपूर्ण भारतात 1-दिवसीय शिबिरे आणि सामूहिक साधनांसंबधी** कृपया या लिंकवर क्लिक करून पहावे- https://www.vridhamma.org/1-day-Courses-Information-in-India

°°°°°°°°°°°°°°°°°°°°°°

## विपश्यना विशोधन विन्यास

विपश्यना विशोधन विन्यास (Vipassana Research Institute=VRI) एक अशी संस्था आहे जी साधकांकरीता धर्मासंबंधी प्रेरणादायक पाठ्य सामग्री मूळ किंमतीवर उपलब्ध करवून देते. इथले सर्व साहित्य अतिशय कमी किंमतीवर उपलब्ध आहे जेणेकरून जास्तीत जास्त साधक याचा व्यावहारिक लाभ घेऊ शकतील. विपश्यना साधनेसंबंधी अनमोल साहित्याचा हिंदी, इंग्रजी तसेच इतर भाषांमध्ये अनुवाद तसेच शोधकार्य करायचे आहे त्याकरीता विद्वानांची आवश्यकता आहे. शोधकार्य मुंबईच्या या पत्त्यावर होत असते- **‘विपश्यना विशोधन विन्यास’**, परियत्ति भवन, विश्व विपश्यना पगोडा परिसर, एस्सेल वर्ल्डच्या जवळ, गोराई गाव, बोरीवली पश्चिम, मुंबई- 400 091, महाराष्ट्र, भारत. फोनः कार्यालय: +9122 50427560, मो. (Whats App) +91 9619234126.

याव्यतिरिक्त VRI हिंदी, इंग्रजी आणि मराठीच्या मासिक पत्रिकांच्या माध्यमातून पूज्य गुरुजींच्या द्वारे झालेले पत्राचार, जुने ज्ञानवर्धक लेख, दोहे, इंटरव्यूह, प्रश्नोत्तर इत्यादींच्या स्वरूपाने प्रेरणाजनक संस्मरणांना प्रकाशित करत असते ज्यामुळे साधकांची धर्मपथावर उत्तरोत्तर प्रगती होत राहिल. या सर्व कार्यांना पुढे अविरतपणे चालू ठेवण्यासाठी साधकांचा सहयोग अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात अनेक साधकांच्या लाभार्थ धर्मवाणीचे प्रकाशन अविरतपणे चालू राहावे याकरीता यामध्ये सहयोग देणाऱ्या इच्छुक साधकांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क करावा. या संस्थेमध्ये दानशूरांसाठी सरकारकडून आयकर अधिनियम 1961 च्या धारा 35-(1) (iii) या नियमानुसार 100% आयकराची सूट उपलब्ध आहे. साधक याचा लाभ घेऊ शकतात. **दानासाठी बँक विवरण अशा प्रकारे आहेः—**

**विपश्यना विशोधन विन्यास,** एक्सिस बँक लि., मालाड (प.)

खाते क्र. 911010004132846; IFSC Code: UTIB0000062

**संपर्क-** 1. श्री डेरिक पेगाडो - 022-50427512/ 28451204

2. श्री बिपिन मेहता - 022-50427510/ 9920052156

3. ईमेल - audits@globalpagoda.org

4. वेबसाइट- https://www.vridhamma.org/donate-onlin

°°°°°°°°°°°°°°°°°°°°°°

**ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये**

**1. एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः**

1. रविवार 14 जानेवारी 2024 संघदान आणि महाशिबिर
2. रविवार 04 फेब्रुवारी, मेगा इवेंट-**'डॉक्यूमेंट्री फिल्म'** चे विमोचन व अन्य कार्यक्रम

**Online registration:** *http://oneday.globalpagoda.org/register* **Email:** *guruji.centenary@globalpagoda.org* or *oneday@globalpagoda.org*

इतर कोणत्याही प्रकारच्या माहितीसाठी संपर्कः

*info@globalpagoda.org* or *pr@globalpagoda.org*

## विपश्यना विशोधन विन्यास द्वारा "पाल" योजना

**प्रिय धर्म परिवार,** गुरु पौर्णिमेच्या या प्रसंगी विपश्यना विशोधन विन्यासद्वारे प्रोजेक्ट "पाल" – धर्माचा खजिनाची घोषणा करताना खूप आनंद होत आहे.

जसे की आपण सर्व जाणता की या अनमोल धर्माला आचार्यांच्या शुद्ध परंपरेद्वारे सांभाळून ठेवले गेले आणि पूज्य एस. एन. गोयंकाजींद्वारे याच्या प्राचीन शुद्धतेसह आपल्याला दिला गेला, ज्याला अनेकांच्या लाभासाठी सांभाळून सुरक्षित ठेवण्याची आणि भविष्यातील पिढ्यांना याला शुद्ध रूपामध्ये प्रदान करण्याची आवश्यकता आहे. म्यंमा वरुन आणलेली ताडपत्रे आणि हस्तलिपी, दुर्लभ पुस्तके, छायाचित्र, विविध कलाकृती, ऑडिओ आणि व्हिडिओ टेपच्या रूपात दुर्लभ सामग्रीचा विशाल खजिना उपलब्ध आहे. यात गोयंकाजींचा अति दुर्लभ असा व्यक्तिगत संग्रह सुद्धा सामील आहे.

**'पाल'-धर्माच्या खजिन्याचे विवरण–**

- छायाचित्र, प्रतिमा – 20,000 पेक्षा अधिक
- ऋणात्मक (निगेटिव्हस्) – 8,000 पेक्षा अधिक
- पत्र, दस्तावेज़ आणि प्रतिलेख – 2,10,000 पेक्षा अधिक
- समाचार पत्र, मासिक पत्रिका – 10,000 पेक्षा अधिक
- डायरी आणि नोटबुक्स – जवळजवळ 500
- मुद्रित पुस्तके – 12,000 पेक्षा अधिक
- ताडपत्रे आणि हस्तलिपि – जवळजवळ 28
- ऑडियो आणि व्हिडियो टेप संग्रह – 3, 000 पेक्षा अधिक
- पेंटिंग्स – बुद्धांच्या जीवनावर 130 पेक्षा अधिक मोठी चित्र सांभाळून ठेवली आहेत.
- शिबिर आवेदन फॉर्म – 12 लाखापेक्षा अधिक आहे.

या सामग्रीला पर्यावरणीय परिस्थितीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या जोखमीपासून वाचवण्यासाठी परियोजना 'पाल', जिचा अर्थ आहे धम्म शिकवणीला सुरक्षित ठेवणे, सांभाळून ठेवणे, एक अत्याधुनिक संरक्षण सुविधेची योजना बनवली गेली आहे, जी जवळपास 5,000 वर्ग फुट (Sq ft) क्षेत्रामध्ये असेल. यात तापमान नियंत्रित वातावरणाबरोबर आग-प्रतिरोधी स्टोअरची सुविधा असेल. वरील मजल्यावर असल्यामुळे ही पाण्यापासून सुद्धा सुरक्षित असेल.

या परियोजनेवर जवळपास 300 लाख रुपये खर्च होण्याचे अनुमान आहे. येणाऱ्या पिढ्यांच्या हितासाठी या पुण्यदायी कार्याकरीता आपले योगदान महत्वपूर्ण ठरेल.

कृपया प्रोजेक्ट 'पाल' 'धर्माचा खजिना' चा एक लघु व्हिडियो पाहण्यासाठी खालील युट्युब लिंक वर क्लिक करा: https://youtu.be/eK-dJPWnOhs

आमची वेबसाइट, मोबाइल ॲप, स्कॅन, यूपीआय, क्यू आर कोड, नेट बँकिंग द्वारा कोणीही ऑनलाइन दान करु शकतात किंवा आमच्या पत्त्यावर चेक पाठवू शकतात.

दान विकल्पांसाठी लिंक: https://www.vridhamma.org/Donation-to-VRI

VRI ला दान दिल्यावर भारतीय नागरिकांना 100% आयकर सुटीचा लाभ होतो.

**सर्वांचे मंगल होवो!**

विपश्यना विशोधन विन्यासला दान देण्यासाठी बँक विवरण या प्रकारे आहे–
विपश्यना विशोधन विन्यास, ॲक्सिस बँक लि., मालाड (प.)

खाते क्र. 911010004132846; IFSC Code: UTIB0000062

संपर्क- 1. श्री डेरिक पेगाडो - 022-50427512/ 28451204
2. श्री बिपिन मेहता - 022-50427510/ 9920052156
3. ईमेल - audits@globalpagoda.org
4. वेबसाइट- https://www.vridhamma.org/donate-online

### दोहे धर्माचे

हिंदू न बौद्ध आहो, मुस्लिम जैन न जात।
धर्मपथाचा पथिक मी, सुखी राहु दिनरात॥
धर्म सदा मंगल करे, धर्म करतो कल्याण।
धर्म सदा रक्षा करतो, धर्म खूप बलवान॥
धर्म आमचा बंधु हो, सखा सहायक मित्र।
चालू धर्माची रीतच, असो धर्माशी प्रीत॥
धर्म सदृश रक्षक नसे, धर्म सदृश न ढाल।
धर्म पालकांचा सदा, धर्म असे रखवाल॥

### दोहे धर्माचे

धर्म जगाचा ईश्वर, धर्म ब्रह्म भगवान।
धर्म शरण मंगल करे, धर्म शरण सुख खाण॥
या धरतीवर धर्माचा, होवो मंगल घोष।
दूर होवो दुर्भावना, असो धर्माचा होष॥
काळी रात्र अधर्माची, दुख पसरे बहु काळ।
धन्य धर्म सूर्य उगे, आणे सुखी सकाळ॥
हो अनुकंपा धर्माची, करुणेने भरपूर।
उघडा द्वार मोक्षाचे, अडचणी होत दूर॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनीः (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2567, मार्गशीर्ष पौर्णिमा, 26 डिसेंबर, 2023 वर्ष 7 अंक 10

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/286/2021-2023

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 11 DECEMBER, 2023, DATE OF PUBLICATION: 26 DECEMBER, 2023**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244998, 243553, 244076,
244086, 244144, 244440
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org